झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/प्र.क्र.१७७/ ४२८९ /२०१८
दिनांक :

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुर्दीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. १९/०६/२०१० रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. प्रस्तावाच्या अनुषंगाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी स.नं.११ (पै.) इंद्रायणीनगर, महमंदवाडी, हडपसर, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि. ०६/०१/२०११ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण १३१ झोपडीधारकांपैकी असून त्यापैकी पात्र निवासी ६९, पात्र बिगर निवासी ०४ व संयुक्त ० असे एकुण ७३ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. ७३ झोपडीधारकांपैकी ६४ झोपडीधारकांनी म्हणजेच एकूण ८७.६७% झोपडीधारकांनी मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे क्षेत्रिय अधिकारी, हडपसर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल सादर केला आहे. तसेच कार्यालयीन परिपत्रक क्रमांक २१५ दि. ०१/०७/२०१७ मधील कार्यपद्धतीनुसार तत्कालीन सक्षम प्राधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर दि.१९/११/२०१० रोजी स्थळपाहणी केली असून त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.सदर दोन्ही अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे;

आणि ज्याअर्थी ;महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे तरतूदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.

Desktop\Nikita\Kakde\Jahir Prakatan Format\11 3c.docx

झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ व मुळ अधिनियमातील ३(क) चे तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पूर्वसुचना, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २५/१०/२०१८, पृष्ठ क्र.२२ व २३ वर प्रसिध्द करणेत आले असून त्यास योजनाक्षेत्रातही प्रसिध्दी देणेत आली आहे. तसेच विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. व मा.जिल्हाधिकारी पुणे जिल्हा, पुणे यांना सदरची नोटीस बजावण्यात आली आहे. सदर बाबतीत ३० दिवसांच्या (दि.१६/११/२०१८ अखेर) विहित मुदतीत सुचना / हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे अनुसुचिमध्ये निर्दिष्ठ क्षेत्र उक्त कलमाखाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी पांडूरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे. सदरचे घोषित पुनर्वसन क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) व झोपुप्रा पुणे चे नियमावलीतील SR १९(१) मधील तरतूदीनुसार विकसित केले जाईल.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (२) मधील तरतूदीनुसार शिखर तक्रार निवारण समिती, ४ था मजला, झो.पु.प्रा. कार्यालय, प्रो. अनंत कणेकर मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई ११ अपील दाखल करता येईल आणि शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपुर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| स.नं.११ (पै.) इंद्रायणीनगर, महमंदवाडी, हडपसर, पुणे | ६१७२.६४ चौ. मी. | **पुर्वेस -** ज्ञाती इस्टेट<br>**पश्चिमेस -** रस्ता महंमदवाडी, टेलिफोन एक्सचेंज<br>**उत्तरेस -** रस्ता मोकळी जागा<br>**दक्षिणेस -** मोकळी जागा | मे.सम्यक गृहनिर्माणा प्रा.लि., २४ संकल्प आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे-०४ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक - २६/११/२०१८